# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

मध्यवर्ती कार्यालय :- 'तारांगण', कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा- ४१५००१.

राज्य कार्याध्यक्ष संपर्क : 'भास्कर' ६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे - ४२४ ००१.
भ्रमण ध्वनी : ९४२२७९०६१० Email : avinashpatilmans@gmail.com


## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व
## समविचारी पक्ष, संघटना, संस्था आयोजित
## राष्ट्रीय प्रबोधन अभियान
## 'हिंसा के खिलाफ, मानवता की ओर'
## २० जुलै ते २० ऑगस्ट २०१६

## ॥ सामुहिक संकल्प ॥

मी असा संकल्प करतो/करते की,

मी आयुष्य जगतांना कधीही कोणत्याही स्वरूपाची हिंसा करणार नाही. हिंसेचे समर्थन करणार नाही. हिंसक कृतीस प्रवृत्त करणाऱ्या अफवा पसरवणार नाही. कारण कोणतीही हिंसक कृती, हिंसक वक्तव्य व हिंसक भाषा ही माणूसकीला छेद देणारी, मानवी समुहांमध्ये भेद निर्माण करणारी आणि देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण करणारी बाब असते हे मला मान्य आहे.त्यामुळे लिंग, वर्ग, जात, धर्म, भाषा व प्रदेश या आधारे होणाऱ्या हिंसेचा मी विरोध करीन किमान सर्व शक्तीनिशी निषेध करीन.

कोणत्याही प्रश्नांची सोडवणूक करतांना व अन्यायाशी संघर्ष करतांना देखील मी अहिंसक आणि संवैधानिक मार्गानेच कृती करेल. कारण प्रश्नांची सोडवणूक करण्याचा तोच मानवी व शाश्वत मार्ग आहे यावर माझा विश्वास आहे.

माझे आयुष्य अहिंसेसाठीच समर्पित आणि कटीबद्ध राहील असा संकल्प मी घेत आहे.